आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२ जानेवारी २०२५ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- नवी दिल्लीतल्या ९०० कोटी रुपये पेक्षा जास्त खर्चाच्या विविध विकासकामांचं उद्या प्रधानमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण आणि पायाभरणी
- दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागाचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने केलेल्या प्रयत्नांची प्रधानमंत्र्यांनी केली प्रशंसा
- सन २०२४ मधे देशात वाहन विक्रीत ९ टक्के वाढ

**आणि**

- देशाच्या अनेक भागात थंडीचा कडाका कायम

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्ली इथं विविध विकास कामांचं उद्घाटन आणि पायाभरणी करतील. जेजे क्लस्टर मधल्या रहिवाशांसाठी  बांधलेल्या सुमारे १७ शे फ्लॅट्स चं ते उद्घाटन करतील, तसंच नवी दिल्लीतल्या अशोक विहार इथल्या पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या घराची चावी सुपूर्द करतील. दिल्लीतल्या  दोन नागरी पुनर्विकास प्रकल्पांचं  ते  उद्घाटन करतील. द्वारका इथल्या सुमारे ३०० कोटी रुपये खर्चाच्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या एकात्मिक कार्यालय संकुलाचं उद्घाटनही ते करतील. दिल्ली विद्यापीठातल्या  ६०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या तीन नवीन प्रकल्पांची प्रधानमंत्री उद्या पायाभरणी करतील. यामध्ये नजफगढ इथल्या वीर सावरकर महाविद्यालयाच्या इमारतीचा समावेश असून, या ठिकाणी  अत्याधुनिक शिक्षण सुविधा उपलब्ध केल्या जातील.

**<><><><><>**

ओएनडीसी, अर्थात डिजिटल व्यवहारांसाठीच्या खुल्या नेटवर्कमुळे लहान व्यवसाय सक्षम झाले असून, ई-कॉमर्समध्ये क्रांती झाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. विकास आणि समृद्धी पुढे नेण्यात ओएनडीसी महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं त्यांनी समाज माध्यमवरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

भारतात ई-कॉमर्सचं लोकशाहीकरण करण्याच्या उद्देशानं २०२१ साली केंद्रसरकारनं ओएनडीसी सुरु केल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांनी म्हटलं आहे. विक्रेते आणि ग्राहक यांच्यातलं अंतर कमी करून, ओएनडीसी देशाच्या ई-कॉमर्स परिप्रेक्ष्यात क्रांती घडवत आहे, असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागाचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने केलेल्या प्रयत्नांची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रशंसा केली आहे. यामुळे या भागातल्या जीवन सुलभतेला चालना मिळेल, आणि प्रगतीचा मार्ग मोकळा होईल, असं त्यांनी समाजमाध्यमवरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. गडचिरोली इथं काल ११ नक्षली अतिरेक्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर आत्मसमर्पण केलं. या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री मोदी यांनी गडचिरोलीतल्या नागरिकांचं विशेष अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र पोलीस दल आज आपला वर्धापन दिन साजरा करत आहे. १९६१ मधे तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरु यांनी याच दिवशी महाराष्ट्र पोलीस दलाला स्थापनादिनाचा ध्वज प्रदान केला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,

उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसंच इतर अनेक मंत्री, लोकप्रतिनिधी, राजकीय पक्ष तसंच सामाजिक कार्यकर्त्यांनी पोलिस दिनानिमित्त पोलिस दलातल्या अधिकारी कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

भोपाळ वायूगळती दुर्घटनेतल्या  यूनियन कार्बाइड कारखान्यातला ३७७ टन घातक कचरा काढण्याचं काम सुरु झालं आहे. हा कचरा बारा सीलबंद डब्यांमधून धार जिल्ह्यातल्या पिथमपूर औद्योगिक परिसरात नेला जात आहे. याबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनीधीकडून…

**v/c**

*( २ आणि ३ डिसेंबर १९८४च्या मध्यरात्री युनियन कार्बाइड कीटकनाशक कारखान्यातून अत्यंत विषारी मिथाइल आयसोसायनेट वायूची गळती झाली. या घटनेत सुमारे पाच हजार ४७९ लोकांचा मृत्यू झाला तर हजारो लोक गंभीर आणि दीर्घकालीन आरोग्य समस्यांनी ग्रस्त आहेत. या घटनेच्या चाळीस वर्षांनंतर, काल या कारखान्यातला घातक कचरा काढण्याचं काम सुरु झालं. हा कचरा बारा सीलबंद डब्यांमधून धार जिल्ह्यातल्या पिथमपूर औद्योगिक परिसरात नेला जात असून काल रात्री कचरा घेऊन जाणारे १२ ट्रक रवाना झाले आहेत. हा कचरा नेण्यासाठी ग्रीन कॉरिडॉर तयार करण्यात आला आहे. युनियन कार्बाइडचा हा रासायनिक कचरा पिथमपूरच्या रामकी एन्व्हायरो कंपनीत जाळण्यात येणार आहे. भट्टीतून निघणारा धूर चार-स्तरीय फिल्टरद्वारे बाहेर पडेल जेणेकरुन आजूबाजूचा परिसर प्रदूषित होणार नाही. उच्च न्यायालयाने ६ जानेवारीपर्यंत हा विषारी कचरा*

*काढून टाकण्याचे निर्देश दिले होते. सरकारला उद्या ३ जानेवारी रोजी उच्च न्यायालयात यासंदर्भात अहवाल सादर करायचा आहे.*)

**<><><><><>**

२०२४ या वर्षी देशात वाहन विक्रीत ९ टक्के वाढ झाली असून ती २ कोटी ६० लाखापर्यंत पोहोचली आहे. कोविड काळापूर्वीचा २०१८ मधला २ कोटी ४५ लाखाचा उच्चांक या वर्षात वाहनविक्रीने ओलांडला. वैयक्तिक उपभोगासाठी खर्च करण्य़ाची ऐपत वाढल्याचं हे निदर्शक आहे. पायाभूत सुविधा क्षेत्रावर अधिक लक्ष देण्याचं सरकारचं धोरण वाहन उद्योगाला प्रोत्साहन देणारं ठरेल असं मत उद्योगविषयक तज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

नवी दिल्लीत प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या संचलन सोहळ्याची तयारी सुरु आहे. कर्तव्यपथावर संरक्षण दलाच्या सैनिकांकडून संचलनाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. दरम्यान, प्रजासत्ताक दिन संचलन आणि बीटिंग रिट्रीटसाठी तिकिटांची विक्री आजपासून सुरू झाली. आमंत्रण डॉट एम ओ डी डॉट जीओव्ही डॉट इन या संकेतस्थळावरुन किंवा आमंत्रण ॲप वरुन थेट तिकिटं खरेदी करता येतील.

**<><><><><>**

दुबई मधल्या भारतीय दूतावासानं आपल्या अम्नेस्टी सुविधेचं कार्यान्वयन यशस्वीपणे पूर्ण झाल्याचं घोषित केलं आहे. १ सप्टेंबर २०२४ रोजी ही सुविधा सुरु करण्यात आली होती. भारतीय वाणिज्य दूतावास आणि अल अविर इथल्या केंद्रांच्या माध्यमातून, संयुक्त अरब अमिरातीतल्या १५ हजाराहून जास्त भारतीयांना व्हिसा नियमित करण्यासाठी सहाय्य करण्यात आलं.

चार महिने चाललेल्या या कार्यक्रमात भारतीय वाणिज्य दूतावासानं २ हजार ११७ पारपत्र आणि ३ हजार ५८९ आपत्कालीन प्रमाणपत्र जारी केली. या दरम्यान ३ हजार ७०० पेक्षा जास्त लोकांना युएई बाहेर पडण्याचे परवाने जारी केले.

कार्यक्रमाच्या समाप्ती बरोबर, भारतीय वाणिज्य दूतावासानं युएइ सरकारच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली, आणि भारतीय नागरिकांनी युएई मध्ये प्रवेश,

काम आणि निवास याबाबतच्या स्थानिक नियमांचं पालन करावं, असं आवाहन केलं.

<><><><><>

अमेरिकेत काल नववर्षाच्या पहिल्याच दिवशी न्यू ऑरलियन्स इथल्या फ्रेंच क्वार्टर मध्ये एक व्यक्तीने गर्दीत ट्रक घुसवून केलेल्या हल्ल्यात १५ जणांचा मृत्यू झाला तर ३५ जण जखमी झाले. ट्रक घुसवणारा माथेफिरू तरुण ४२ वर्षाचा असून शमसुद्दीन बहार जब्बार अस त्याच नाव आहे आणि तो पोलिसांच्या गोळीबारात मारला गेला. त्याच्या कडून एक रायफल जप्त करण्यात आली असून ट्रक वर लावलेले काळे झेंडे कोणत्या दहशतवादी संघटनेशी संबंधित आहेत का याचा पोलिस तपास करत आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडन यांनी या घटनेचा निषेध केला असून, मृतांच्या कुटुंबियांप्रति सहवेदना व्यक्त केली आहे तसच जखमींना सरकारतर्फे सर्व मदत द्यायच आश्वासन दिल आहे.

<><><><><>

महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यात आकारी पड जमिनीसंदर्भातल्या तरतुदीत सुधारणा करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं आज घेतला.

शासकीय कर्मचाऱ्यांचं वेतन आणि भत्ते प्रदान करण्यासाठी मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेत वैयक्तिक खाते उघडायला, तसंच महामंडळ, सार्वजनिक उपक्रम यांच्याकडचा अतिरिक्त निधीची गुंतवणूक प्राधिकृत करालाही मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली.

<><><><><>

देशाच्या अनेक भागात थंडीचा कडाका कायम आहे. हिमाचल प्रदेश,छत्तीसगड, बिहार या राज्यांत अनेक ठिकाणी पारा खाली गेला आहे. पुढील काही दिवस थंडीची लाट कायम राहणार असून सिमला,मनालीच्या पर्वतीय भागांत बर्फवृष्टीची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. या ठिकाणच्या मैदानी भागात वादळी वारे आणि मुसळधार पावसाचा अंदाज असून इथं यलो अलर्ट दिला आहे. यामुळे या ठिकाणचं तापमान आणखी खाली जाण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**हिमाचल प्रदेशा**तही कडाक्याची थंडी असून लाहौल स्पिती जिल्ह्यात ताबो इथं उणे १४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. पर्वतीय भागांत थंडीचा कडाका अधिक असून मैदानी भागात तुलनेत अधिक नोंदवलं गेलं आहे.

**छत्तीसगड**मध्येही पर्वतीय भागांत थंडीची लाट आहे. बिलासपूर इथं धुक्यामुळे दृश्यमानता अतिशय कमी झाल्यानं वाहतूकीवर परिणाम झाला आहे. पुढील २४ तासांत धुकं अधिक दाट होण्याची शक्यता असून हवामान विभागानं सर्तकतेचा इशारा दिला आहे.

उत्तरेतल्या थंडीचा परिणाम **बिहार**मध्ये दिसत आहे. राज्यातल्या तापमानात मोठी घट झाली आहे. थंडीची लाट आणखी तीन ते चार दिवस राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**<><><><><>**

उत्तर भारतात दाट धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाली असून लांब पल्ल्याच्या रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला आहे. दिल्लीकडे जाणाऱ्या ४३ गाड्या

पाच तास उशिरा धावत आहेत, त्यामुळे प्रवाशांनी आपल्या गाडीची सद्यःस्थिती तपासूनच स्थानकावर जावं, असं आवाहन रेल्वे प्रशासनानं केलं आहे.